सोबत तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना अंमलबजावणीबाबत"**पत्र क्रमांक क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१-२२/१० दिनांक १७/०१/२०२२ सोबत जोडलेली आहे.कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्र.विकाअ/शिक्षण/शिष्यवृत्ती /२०२२/ 239,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 24 JAN 2022

**प्रति,**

**प्राचार्य**, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना सदर पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याकरीता अग्रेषित.

**प्र.सहसंचालक,**
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत: प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

F/(

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिकामार्ग, पत्रपेटीक्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. : ०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१-२२/१०
दिनांक : १७/ ०१ / २०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना" अंमलबजावणीबाबत ....**

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१-२२/४२७ दि.१३/१०/२०२१
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२१-२२/४४३ दि.२८/१०/२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२१-२२/४४७ दि.०३/११/२०२१
४. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४५१ दि.०९/११/२०२१--VC
५. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४७८ दि.०१/१२/२०२१
६. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४८८ दि.२०/१२/२०२१
७. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४९५ दि.२४/१२/२०२१
८. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/०४ दि.०५/०१/२०२२
९. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांचेकडून दि.१६/१२/२०२१ च्या ईमेलने प्राप्त संदेश.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका,पदवी ) **शिकणाऱ्या अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सन २०२१-२२ पासून सुरू केलेली आहे. सदर योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

**"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** या योजनेच्या मार्गदर्शक तत्वे / FAQ नुसार **ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे** अशा विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद असणे आवश्यक आहे.

तरी याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना असे कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना, **ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे** व योजनेचा लाभासाठी अर्ज करु इच्छितात अशा विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे सूचित करण्याबाबत कळविण्यात यावे.

१. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे कारण नमूद असलेले मृत्यू प्रमाणपत्र अर्जासोबत Upload करावे. **किंवा**

शि.वि.०१
24/01/22



प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
आवक क्र. 324 दिनांक 24-1-22

२. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद नसेल तर त्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज करतेवेळी, मृत्यू प्रमाणपत्रासोबत **कोविड-१९ मुळे मृत्यू** नमूद असलेली रुग्णालयाची Discharge Slip / **Form No.4** / **Form No. 4A** अपलोड करावे.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.